**नि.दिवाणी दावा क्रं.३६/२०१५**
**नि. क्रं.३७**

**:: प्रतिवादी क्र.९ यांना नंतर पक्षकार केल्याने त्यांच्याकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.व्ही. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

०२. मला लिहिता व वाचता येते. वंदना आणि सोजर या दोन बहिणी आहेत. त्यांना तीन भाऊ आहेत. त्यापैकी बाबुराव जिवंत आहे. ईतर दोन भाऊ केंव्हा मृत्यू पावले हे मला सांगता येत नाही. नागशेट्टी बिरादार यांचे गावामध्ये एक घर आहे. त्याचा घर क्रमांक मला सांगता येत नाही. त्यांच्या शेताचा सर्वे क्र.४१ आहे. त्यामध्ये कोणाच्या नावे किती जमीन आहे हे मला माहीत नाही. बाबूराव, बालाजी व योगीराज यांनी १९९७ मध्ये वाटप करून घेतले आणि त्याआधारे हुकुमनामा प्राप्त केला हे मला माहिती नाही. त्याच्या तिघांच्या नावे जमीन नोंदविलेली आहे, हे म्हणणे खरे आहे. बालाजीला एक पत्नी होती. परंतु तिचे नाव मला सांगता येत नाही. बालाजीच्या पत्नीने आणि मुलीने त्यांची जमीन श्रीमंत तेलगावे यांना विकलेली आहे व तेव्हापासून ती जमीन त्यांच्या ताब्यात आहे, हे मला माहीत नाही.

०३. बाबू नागशेट्टी हे १२ एकर जमिनीची वहिती करतात याबाबत मी कागदपत्र बघितलेले नाही किंवा त्याबाबत ७/१२ पत्रकी नोंद झाली, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वंदना आणि बाबू नागशेट्टी

यांनी सांगितल्याप्रमाणे खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.
दि.२२/०१/२०२६.